नव्याने स्थापित स्त्री रूग्णालय, मालेगाव करीता कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी घोषित करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण- २०१९/ प्र.क्र. २२१/ आरोग्य-३**
१० वा मजला, ए विंग ,गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१
तारीख: २ ऑगस्ट, २०१९

**वाचा -**

1. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः पदनि-२०१७/प्र.क्र.२३१/आ-३, दिनांक. १६.०२.२०१८
2. आरोग्य सेवा संचालनालय यांचे क्रमांकः संआसे/कक्ष-३/टे-७/स्त्री रुग्णालय मालेगाव आ.सं.अधि/४९०६-०७/१९, दि.२५.०३.२०१९ चे पत्र

**प्रस्तावना**

स्त्री रूग्णालय, मालेगाव या १०० खाटांच्या रूग्णालयाकरीता उपरोक्त दि. १६.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदनिर्मिती करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र. २ नुसार प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर रूग्णालयाकरीता कार्यालय प्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय-**

स्त्री रूग्णालय, मालेगाव या १०० खाटांच्या रूग्णालयाकरीता "वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१ (गट-अ)" या मंजूर पदास कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय १७ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रसिद्ध वित्तीय अधिकार नियम पुस्तिका नियम क्र. २ नुसार प्रशासनिक विभागाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.२९२/२०१९ / कोषा प्रशा-५, दि.२२.०७.२०१९ अन्वये देण्यात आलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०२१२५४४७८६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.08.02 14:57:38 +05'30'

**(रो.दि. कदम-पाटील)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. आयुक्त ( आरोग्य सेवा) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान , मुंबई.
२. महालेखापाल ( लेखा परीक्षा) / (लेखा अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
३. संचालक -१, आरोग्य सेवा, मुंबई.
४. अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
५. उप संचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक.
६. वैद्यकीय अधिक्षक, जिल्हा स्त्री रूग्णालय, मालेगाव.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक.
८. जिल्हा आरोग्य अधिकारी, नाशिक.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.
१०. निवडनस्ती ( आ-३)